# नवीन वर्ष

नवीन वर्षात, नवीन काय?

तसे पाहता दिवस तेच ते,
रात हि येते तशीच सरते...
तरी मनाला आस कशाची?
स्वप्न नवे बघ उरात भरते !

नवीन वर्षात, नवीन काय?

जुने सोडतो, नवे कल्पितो,
सरले त्याचे गणित मांडतो..
आसू आणिक हसू जोडूनी,
नव्या उद्याशी गाठ बांधतो !

थोडक्यात काय ?

नव्याची चाहूल, जुन्यावरची खपली
पेचांच्या डोक्यावर, युक्तीची टपली...
हसत-हसत लढण्याची नवी एक कला,
मागे न बघता आता पुढे पुढे चला !!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**